दैनिक हेराल्ड गोवा शुक्रवार, २५ एप्रिल २०२५ 3

## निवडक

### राज्यातील ६३ गावांमध्ये 'मॉडेल सोलर व्हिलेज'साठी स्पर्धा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४** : गोव्यातील ६३ गावे मॉडेल सोलर व्हिलेज म्हणून विकसित होण्यासाठीच्या स्पर्धेस पात्र ठरली आहेत. या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सौर ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण वस्त्यांना त्यांच्या ऊर्जेच्या गरजांमध्ये स्वावलंबी बनविणे आहे . स्पर्धेमध्ये जिंकणाऱ्या गावाला १ कोटीचे केंद्र अनुदान मिळणार आहे .

गोव्यातील हरित ऊर्जा उपक्रम राबविणारी नोडल एजन्सी, गोवा ऊर्जा विकास संस्था ने गेल्या जनगणनेच्या आधारावर उत्तर गोव्यातील ४० आणि दक्षिण गोव्यातील २३ गावे या स्पर्धेसाठी संभाव्य उमेदवार म्हणून निवडली आहेत. ही गावे राज्य सरकारच्या मंजुरीनंतर सहा महिन्यांच्या कालावधीत स्पर्धात्मक मोडमध्ये असतील.

निवडलेल्या गावांमध्ये अक्षय ऊर्जेच्या स्थापनेसाठी गोवा सरकारने ३० जून २०२५ पर्यंतचे लक्ष्य निश्चित केले आहे. या स्पर्धेच्या कालावधीनंतर, अंमलबजावणी संस्था प्रत्येक गावाच्या क्षेत्रामध्ये स्थापित सौर ऊर्जेच्या क्षमतेचे मूल्यांकन करतील. यामध्ये छतावरील सौर प्रतिष्ठापना, तसेच पीएम कुसुम योजनेअंतर्गत जमिनीवर बसवलेले लघु प्रमाणातील सौर प्रकल्प, किंवा १० मेगावॅटपेक्षा कमी क्षमता असलेले सौर प्रकल्प समाविष्ट असतील.केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सर्वाधिक सौर ऊर्जा क्षमता असलेले गाव त्या जिल्ह्यात मॉडेल सौर व्हिलेज म्हणून निवडले जाईल. या योजनेत जिंकणाऱ्या गावाला १ कोटी रुपयांचे रोख बक्षीस मिळेल, जे सौर–ऊर्जा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापरले जाईल. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे गावांमध्ये हरित आणि स्वच्छ ऊर्जेची उपलब्धता वाढवणे. तसेच, ग्रामीण समुदायांना त्यांच्या ऊर्जेच्या गरजांमध्ये स्वावलंबी बनवणे, स्थानिक पातळीवर वीज निर्मिती करून युटिलिटी कंपन्यांवरील अवलंबित्व कमी करणे आणि वीज बिलांमध्ये बचत करणे हे आहे.

# कॅसिनोसाठी पार्किंग जागा हस्तांतरित करण्याविरोधात याचिका

टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव/ पणजी, दि. २४** : पणजी फेरी व्हार्फजवळील सार्वजनिक पार्किंग क्षेत्र कॅसिनो कंपनीला हस्तांतरित करण्याच्या निर्णयावर उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेत आरोप करण्यात आला आहे की, या निर्णयाने पारदर्शकतेचा अभाव आहे, तो बेकायदेशीर आहे, आणि तो योग्य कायदेशीर प्रक्रियेची पूर्णपणे पाळणी न करता लागू करण्यात आलेला आहे.

याचिकाकर्ता जॅक सुखीजा यांनी कॅप्टन ऑफ पोर्ट्स (सीओपी) आणि उत्तर गोवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांवर आरोप केला आहे की त्यांनी सार्वजनिक जागा मेसर्स गोल्डन पीस इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, जे फ्लोटिंग कॅसिनोचे संचालन करतात, यांना त्यांची खासगी वापरासाठी हस्तांतरित केली. याचिकाकर्त्याचा युक्तिवाद आहे की, कॅसिनोचे स्वागत आणि प्रवाशांची हालचाल सुलभ करण्यासाठी घेतलेला निर्णय सार्वजनिक हितासाठी हानिकारक आहे आणि सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या व्यवस्थापनासाठी असलेल्या नियमांचे उल्लंघन करतो.

या याचिकेवर उच्च न्यायालयाने गंभीर विचार केला आहे आणि राज्य सरकार, जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी), बंदरांचे कॅप्टन आणि कॅसिनो कंपनीसह संबंधित अधिकाऱ्यांना नोटिसा बजावल्या आहेत. त्यांना १६ जूनपर्यंत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

याचिकेच्या तपशिलानुसार, पणजी फेरीबोट आणि आसपासच्या परिसराच्या सौंदर्यीकरणासाठी पीडब्ल्यूडीने सुमारे २०–२२ कोटी रुपये खर्च करून या क्षेत्राचे अपग्रेडेशन केले होते. २०१५ मध्ये सीओपीने जिल्हा दंडाधिकाऱ्यांना पत्र दिले होते, ज्यात राज्याच्या महसूल वाढवण्याची आणि राजधानीतील वाहतूक व्यवस्थेचे सुधारण्याची मागणी केली होती.

२४ मे २०१७ रोजी जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी या क्षेत्राचा ६२७ चौरस मीटरचा भाग सार्वजनिक पार्किंग क्षेत्र म्हणून घोषित केला. तथापि, याचिकाकर्त्याने दावा केला आहे की, सीओपीने सार्वजनिक बोली प्रक्रिया न पाळता कॅसिनो ऑपरेटरला सार्वजनिक पार्किंग झोन भाड्याने दिले. याचिकेच्या अनुसार, १३ डिसेंबर २०२३ आणि २२ मार्च २०२४ रोजी जारी केलेल्या आदेशांनी सार्वजनिक सूचना न देता, पार्किंग नियुक्ती रद्द केली, ज्यामुळे कॅसिनोला या जागेचा वापर करण्यास संधी मिळाली.

याचिकेत असा दावा करण्यात आला आहे की, या कृतींमुळे नागरिक आणि पर्यटक एका महत्त्वपूर्ण पार्किंग सुविधेपासून वंचित राहिले आहेत. याचिकाकर्त्याने सांगितले की, सार्वजनिक सुविधा खाजगी व्यावसायिक वापरासाठी हस्तांतरित करणे हे केवळ प्रवेशयोग्यतेवर परिणाम करत नाही, तर कायदेशीर दायित्वांचे उल्लंघन देखील आहे.

याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयाकडे कॅसिनो फर्मला दिलेले डी–नोटिफिकेशन आदेश आणि ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) रद्द करण्याची तसेच सार्वजनिक पार्किंग सुविधा पुनर्संचयित करण्याची मागणी केली आहे. याशिवाय, त्याने तात्पुरती आणि कायमस्वरूपी बांधकामे हटवण्याची आणि सीओपी आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या वर्तनाची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी केली आहे.

याचिकाकर्त्याने खटल्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत, अधिसूचना रद्द करण्याचे आणि कॅसिनोच्या व्यावसायिक क्रियाकलापांवर स्थगिती देण्याचे सूचनात्मक आदेश देण्याची विनंती केली आहे

# बोरी बायपाससाठी घर गमावण्याची धास्ती



टीम दैनिक हेराल्ड

▶ पुनर्वसनाविना नागरिकांच्या चिंता वाढल्या : तात्काळ निर्णय जाहीर करण्याची मागणी

**फोंडा, दि. २४** : बोरी येथे प्रस्तावित नवीन बायपास आणि पूल ॲप्रोच रस्त्यासाठी सुरु असलेल्या भूसंपादन प्रक्रियेमुळे स्थानिक रहिवासी मोठ्या मानसिक तणावात असून, आपले पूर्वजांपासून चालत आलेले घर गमावण्याची भीती व्यक्त करत आहेत. पुनर्वसन अथवा पर्यायी निवासाबाबत कोणतीही स्पष्टता नसल्याने अनेक जणांची झोप उडाली आहे.

स्थानिक रहिवासी तुळसीदास नाईक यांनी सांगितले की, माझे घर आजोबा आणि वडिलांकडून वारसा हक्काने मिळाले आहे. गेल्या १०० वर्षांहून अधिक काळ आम्ही येथे राहतो आहोत. आता अधिकाऱ्यांनी वारंवार येऊन घराचे मोजमाप घेतले असून, हे घर पाडले जाणार असल्याचे सांगितले आहे. मात्र, आम्हाला कुठे स्थलांतरित केले जाणार, किंवा काही भरपाई मिळणार का, याबाबत अद्याप कोणतीही माहिती दिली गेलेली नाही.

राज्य सरकारने बोरी आणि लोटली खाजन भागांतून नवीन बोरी पूल आणि त्याचा बायपास रस्ता प्रस्तावित केला आहे. मात्र, यासाठी शेतजमिनींचे आणि घरांचे भूसंपादन केल्याने स्थानिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. बोरी आणि लोटली येथील नागरिकांनी आपली खाजने गमावल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय हरित लवादाकडे धाव घेतली आहे.

घरमालक प्रेमानंद नाईक यांचे मित्र राहुल नाईक यांनी सांगितले की, बोरी पूल प्रकरण सध्या राष्ट्रीय हरित लवादात प्रलंबित आहे. जोपर्यंत न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत अधिकाऱ्यांनी स्थानिकांना त्रास देऊ नये, ही आमची मागणी आहे.

स्थानिक रहिवाशांनी असा आरोप केला आहे की, नवीन रस्त्यासाठी त्यांच्या घरांना आणि परिसरातील झाडांना लाल खुणा करून चिन्हांकित करण्यात आले आहे. मात्र, अद्याप कोणतेही पुनर्वसन अथवा स्थलांतर धोरण जाहीर करण्यात आलेले नाही. याच पार्श्वभूमीवर नागरिकांनी आठवण करून दिले की, मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी यापूर्वी जाहीरपणे सांगितले होते की नवीन बोरी पुलासाठी कोणतेही घर बाधित होणार नाही.स्थानिक प्रशासनाने यासंदर्भात स्पष्ट भूमिका घ्यावी आणि पुनर्वसनासंदर्भात तात्काळ निर्णय जाहीर करावा, अशी नागरिकांची मागणी आहे.

## व्हिला बांधकाम परवान्यांबाबत काँग्रेस आक्रमक

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २४** : मांद्रे पंचायतीने आश्वे–मांद्रे डोंगर पठारावर व्हिला बांधकामासाठी दिलेले परवाने त्वरित मागे घ्यावेत, अशी मागणी मांद्रे गट काँग्रेस समितीने केली आहे. या मागणीसाठी समितीच्या वतीने पंचायतीला लेखी निवेदन सादर करण्यात आले. मागील काही महिन्यांत मांद्रे पंचायतीने आपल्या कार्यक्षेत्रात व्हिला आणि फ्लॅटसारख्या बांधकाम प्रकल्पांसाठी परवाने मंजूर केले आहेत. या निर्णयावर स्थानिक नागरिकांसह राजकीय वर्तुळातही तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. विशेषतः स्थानिक आमदार जीत आरोलकर यांनी देखील या प्रकल्पांवर विरोध नोंदवत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. याच पार्श्वभूमीवर, मांद्रे गट काँग्रेसने दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन आपला निषेध नोंदवला होता आणि लेखी निवेदन देणार असल्याचा इशारा दिला होता. त्यानुसार, गुरुवारी काँग्रेस शिष्टमंडळाने पंचायत कार्यालयात लेखी स्वरूपात निवेदन सादर करत परवाने मागे घेण्याची मागणी केली. निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, २०२२ सालापासून व्हिला व फार्महाऊस बांधकामासाठी पंचायत विविध परवाने देत आहे. मात्र, या जागांची पाहणी न करता परवाने देण्यात आले आहेत, हे गंभीर बाब आहे. पंचायतीने कोणत्याही प्रकल्पापूर्वी त्या परिसराची पाहणी केली आहे काय, असा सवाल नारायण रेडकर यांनी उपस्थित केला.

# शाळेजवळ तंबाखू विक्री कायम ; पालक संतप्त

## मडगावातील प्रकार : प्रभावी अंमलबजावणी न झाल्याचा आरोप

टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २४** : शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची खुलेआम विक्री सुरु असल्याने मडगावमधील नागरिक व पालकांमध्ये तीव्र नाराजी आणि चिंता व्यक्त केली जात आहे. तंबाखूविरोधी कायद्यांचे उल्लंघन सातत्याने सुरू असल्याचे निदर्शनास येत असून, याप्रकरणी प्रभावी अंमलबजावणी न झाल्याचा आरोप होत आहे.

विशेष म्हणजे, शहरातील एका शाळेजवळील एका दुकानावर यापूर्वी कारवाई करून ते सील करण्यात आले होते. मात्र, काही महिन्यांनंतरच हेच दुकान पुन्हा सुरू झाल्याचे दिसून आले असून, तेथे पुन्हा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री सुरू असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

फेब्रुवारी महिन्यात अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी या दुकानातून १.५ लाख रुपयांचे तंबाखूजन्य साहित्य जप्त केले होते. तरीही, आजही या दुकानामार्फत तंबाखू विक्री सुरू असल्याने प्रशासकीय कारवाईच्या गंभीरतेवर आणि सातत्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून, पालकांकडून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत.

शाळेजवळील दुकानांवर नियमित तपासणी होत नाही, म्हणूनच हे दुकानदार निर्भीडपणे तंबाखू विक्री करत आहेत, असे मत मडगावमधील रहिवासी रीना डिसोझा यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांना हे पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याने त्यांचे आरोग्य आणि भवितव्य धोक्यात आले आहे. प्रशासनाने कडक आणि नियमित कारवाई केली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. याच पार्श्वभूमीवर, अन्य पालक अमरीझ फर्नांडिस म्हणाले की, शाळा सुटल्यानंतर काही विद्यार्थी या दुकानांजवळ थांबून तंबाखूजन्य पदार्थ घेताना दिसतात. ही गंभीर समस्या आहे आणि तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य उत्पादने कायदा, २००३ नुसार, शैक्षणिक संस्थांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास सक्त मनाई आहे. उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई तसेच कारागृहवासाची तरतूद आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी (१) श्रीनेत कोठावळे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, जिल्हा प्रशासन या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत आहे. शाळांच्या परिसरात तंबाखू विक्री रोखण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणांना नियमित तपासणीसाठी निर्देश देण्यात आले आहेत.

पालक आणि स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या आश्वासनांवर नाराजी व्यक्त करत अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात नियमित तपासणी करावी , वारंवार कायदा मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी , शाळांभोवती सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे आवश्यक आहे , तसेच विद्यार्थी व पालकांसाठी जनजागृती मोहिमा राबवणे आवश्यक असल्याची मागणी पालकांनी केली आहे .





# दक्षिण गोव्यात ३७,६८५ शेतकऱ्यांना २४.२६ कोटींचे अनुदान

टीम दैनिक हेराल्ड

▶ निधीची कमतरता असल्यामुळे काही प्रलंबित अर्जांवर प्रक्रिया शिल्लक : जिल्हा कृषी विभागाकडून स्पष्ट

**मडगाव, दि. २४** : २०२४–२५ या आर्थिक वर्षात दक्षिण गोव्यातील ३७,६८५ शेतकऱ्यांना एकूण २४.२६ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आल्याची माहिती जिल्हा कृषी विभागाने दिली आहे. विविध कृषी योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून हे अनुदान देण्यात आले असून, शेती उत्पादनक्षमता, यांत्रिकीकरण आणि शाश्वत शेती पद्धती वाढवण्याचा या मागे उद्देश आहे.

जिल्हा कृषी अधिकारी राजेश प्रभुदेसाई यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, नारळ, तांदूळ आणि काजू यांसारख्या पिकांसाठी लागू असलेल्या समर्थन किंमत योजनेअंतर्गत सर्वाधिक १.९७ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले असून, या योजनेचा लाभ ६,१०१ शेतकऱ्यांनी घेतला आहे.

त्याचप्रमाणे, ट्रॅक्टर, भात कापणी यंत्र आणि इतर शेती यंत्रसामग्रीच्या सेवांना चालना देणाऱ्या यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत दुसऱ्या क्रमांकाचे ३.९५ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले असून, याचा लाभ तब्बल १९,२९८ शेतकऱ्यांना मिळाला आहे. त्याशिवाय यांत्रिकीकरणासाठी उपकरण खरेदीसाठी ६६३ शेतकऱ्यांना ९३.५१ लाख रुपये देण्यात आले आहेत . सिंचन आणि फलोत्पादन सहाय्य म्हणून १,०९२ शेतकऱ्यांना २.०२ कोटी रुपये वाटप करण्यात आले . शेतकरी सहाय्य निधीपोटी १,३१० लाभार्थ्यांना १.८७ कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे . तसेच प्रमाणित बियाणे वितरण योजनेअंतर्गत ५,६२९ शेतकऱ्यांना ५१.४७ लाख रुपये देण्यात आले . कुंपण सहाय्य योजने अंतर्गत १५३ लाभार्थ्यांना ३५.५० लाख रुपये वाटप करण्यात आले आहेत

कृषी योजनांचा लाभ सासष्टी , केपे , सांगे , धारबांदोडा , काणकोण , मुरगाव आणि फोंडा या तालुक्यांमध्ये दिला जात आहे . प्रत्येक प्रस्तावावर जिल्हा पातळीवर प्रक्रिया केली जाते व नंतर संबंधित विभागीय कृषी कार्यालयांमार्फत शेतकऱ्यांना थेट निधी वितरित केला जातो,अशी माहिती प्रभुदेसाई यांनी दिली.

राज्य शासनाच्या प्रयत्नांमध्ये सेंद्रिय आणि सामूहिक शेतीलाही विशेष प्रोत्साहन देण्यात येत आहे. यावर्षी सेंद्रिय शेती योजनेअंतर्गत ७९९ शेतकऱ्यांना ६५.७७ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले, तर सहा सामूहिक शेती गटांना एकूण ३५.५० लाख रुपयांचे सहाय्य प्रदान करण्यात आले आहे.

प्रभुदेसाई यांनी वापरात नसलेल्या जमिनींचा शेतीसाठी पुनर्वापर करण्यावर भर देत शेतकऱ्यांनी अधिकाधिक योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. मात्र, निधीची कमतरता असल्यामुळे काही प्रलंबित अर्जांवर प्रक्रिया अद्याप बाकी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## दवर्लीत रेल्वे उड्डाणपूलासाठी तानावडेंचे मुख्यमंत्र्यांना साकडे

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २४** : दवर्ली रेल्वे क्रॉसिंगवरील वाहतूक कोंडी आणि रहिवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होत असतानाच, राज्यसभेचे खासदार सदानंद शेट तानावडे यांनी गोवा राज्य सरकारने या ठिकाणी उड्डाणपूल उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली आहे. गुरुवारी तानावडे यांनी घटनास्थळी पाहणी केली. यावेळी नावेलीचे आमदार उल्हास तुयेकर, स्थानिक पंचायतीचे सदस्य तसेच कोकण रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.

प्रत्येक दिवशी २० ते ३० गाड्या या क्रॉसिंगवरून जात असल्याने, दर वेळेस रेल्वे फाटक सुमारे २५ मिनिटे बंद राहते. परिणामी, शालेय विद्यार्थी, नोकरीसाठी प्रवास करणारे नागरिक आणि स्थानिक रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून, पर्यायी मार्ग वापरणे अनेकांसाठी वेळखाऊ आणि गैरसोयीचे ठरते.

दवर्ली हे मडगाव रेल्वे स्थानकाच्या अगदी जवळ असून, आके, केपे , कुंकळ्ळी, यांसारख्या गावांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. भविष्यातील वाहतूक वाढ आणि या परिसरातील प्रस्तावित शैक्षणिक केंद्र लक्षात घेता, उड्डाणपूल अत्यावश्यक आहे, असे तानावडे यांनी सांगितले. मडगाव व त्याच्या आसपासच्या भागातील ३० हून अधिक शाळांना या प्रकल्पाचा फायदा होईल, असे त्यांनी नमूद केले.

प्रकल्पासाठी लागणाऱ्या जागेचे संपादन हे मोठे आव्हान असून, रेल्वे क्रॉसिंगच्या दोन्ही बाजूंना पुरेशी जमीन आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर, त्यांनी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी वैयक्तिकरीत्या या ठिकाणी भेट देऊन परिस्थितीचे मूल्यांकन करावे, अशी शिफारस केली. या प्रश्नाचे तातडीने निराकरण करण्यासाठी गोवा सरकार, कोकण रेल्वे आणि दक्षिण पश्चिम रेल्वे यांच्यात प्रभावी समन्वय असणे गरजेचे आहे.


**GOVERNMENT OF GOA**
**OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/ EXECUTION, NORTH GOA DISTRICT,**
At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.

**ABN Case No.:- ARCS/VPK/MAPUSA/2023/ABN/2226**

VPK Urban Co-operative Credit Society Ltd. Mapusa Branch, Bardez Goa. .....Disputant

V/s

1. Mr.Kasim Rajasab Unchal, H.No.290,Nr.Shetye Electronics, Pequen, Duler, Mapusa, Bardez-Goa.
2. Mr. Mohammad Niyaj Kadar Karol, H.No.1611/89, Orda Candolim, Bardez-Goa.
3. Mr. Asif Abdul Shaikh, 4 a/III/4, Acoi Waddo Kamarkhajan, Mapusa, Bardez-Goa.

.......Opponents

**(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)**

To,
The Opponent No. 1, 2 & 3

WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of **Rs.77135.37** (Rupees Seventy Seven Thousand One Hundred Thirty Five and Paise Thirty Seven Only with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks **"Addressee Cannot be Located, Addressee Not staying in such Address & Insufficient Addressee** returned to sender" respectively.

AND WHEREAS, the disputant vide application dated 24.04.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **22.05.2025 at 10.30 a.m.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 24th day of April 2025.

SEAL

Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti
Ponda- Goa.

Place: Ponda
Date: 24.04.2025



**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-II OF PONDA, AT PONDA-GOA**

**Case No.JM-II/Mund/C1/Usgao/11/2024**

1. Mrs. Trupti Janardhan Venji Naik
2. Mr. Janardhan Vasudev Venji Naik Both R/o H. No. 1226, Sainagar, Tisk, Usgao, Ponda Goa. ...Applicants

V/s

1. The Communidade of Usgao Through its attorney, having its office Near Aadinath Temple, Usgao, Ponda Goa.
2. The Administrator of Communidade Having its office at Communidade Bldg., Near Civil Court, Mapusa, Bardez - Goa. 3. Mr. Anup Anant Prabhu R/o Near Sushila Hotel Tisk Usgao Ponda Goa
4. Mr. Gajanan Dattu Usgaonkar 5. Mrs. Gauri Gajanan Usgaonkar 6. Mr. Jeetendra Dattu Usgaonkar 7. Mrs. Swati Jeetendra Usgaonkar Opponent No. 3 to 7 are r/o Sai Nagar, Tisk Usgao, Ponda Goa.
8. Mr. Mangaldas Vithu Gaudo R/o Sainagar Dhaushirem Tisk, Usgao, Ponda Goa.
9. Mr. Raghunath Ram Gaudo R/o Sainagar Dhaushirem,Tisk,Usgao, Ponda Goa. 10. Mr. Laxman Dhoko Gaudo R/o Sainagar, Dhaushirem Tisk, Usgao, Ponda Goa. 11. Mr. Rajendra Chandrakant Naik
12. Mr. Ashok Chandrakant Naik Both r/o Near Cine Kamala Theater, Tisk Usgao, Ponda- Goa

...Opponents

To
The Respondents No 9

**PUBLIC NOTICE**

**WHEREAS** the above named applicant have filed an application in this Court for declaration u/s 8-A of the Goa, Daman and Diu Mundkar (Protection from Eviction) Act, 1975. And application filed by the applicant dated 03/04/2025.

**AND WHEREAS** the notice sent to the above mentioned opponent are returned back with the postal remark **"Insufficient address".** It is reported by the applicant that she is unaware of the present residential addresses of the opponent and above mentioned addressed is the last known address.

**AND WHEREAS** after considering the case of the applicant, I have come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in the local newspaper.

**Therefore,** notice is hereby given to the above mentioned opponent to appear in this Court on **10/06/2025 at 10.30 a.m.** along with material evidence on which they wish to rely upon in person or through duly authorized agent failing which ex-parte order shall be passed and the matter will be decided in his absence.

Given under my hand and the seal of this Court dated this 10th day April, 2025.

SEAL

Sd/- **(Rosario Carvalho)**
Jt. Mamlatdar-II of Ponda
Ponda-Goa.